International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.4 Mar – Apr 2023

# मानवी हक्क व वंचित घटक

**प्रा. अमित ए. बोरसे**
राज्यशास्त्र विभागप्रमुख, क. रा. आहेर महाविद्यालय देवळा
***Corresponding Author*** **- प्रा. अमित ए. बोरसे**
**DOI- 10.5281/zenodo.10673401**

**सारांश –**

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय मानवाचे आयुष्य पूर्णत्वास जाऊ शकत नाही. मानवाच्या सर्वांगीण विकासाकरिता अधिकार किंवा हक्क आवश्यक असतात. यामुळे आधुनिक काळात बहुतांश देशाच्या संविधानात हक्कांना कायदेशीर स्वरूप देण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाकरिता जे हक्क असतात अशा हक्कांना घटनेत समाविष्ट केले की, त्यांना मुलभूत हक्कांचे स्थान प्राप्त होते. तरीही 'मानवी हक्क' ही संकल्पना घटनात्मक हक्कांपेक्षा वेगळी ठरते. सुरुवातीच्या काळात मानवी हक्कांऐवजी 'नैसर्गिक हक्क' हि संकल्पना प्रचलित होती. दुसर्या जागतिक महायुद्धानंतर मात्र मानवी हक्क हि संज्ञा रुढ झाली. मानवाच्या आयुष्यातील विविध जीवनमूल्यांचा आणि क्षमतांचा या संज्ञेत अंतर्भाव होतो. हे हक्क मनुष्याला जन्मतःच प्राप्त होतात असा सर्वसमावेशक अर्थ यामध्ये अपेक्षित आहे.

**सूचक शब्द –** हक्क, मानवी हक्क, नैसर्गिक हक्क, समूह, व्यक्ती, वंचित घटक, राज्यसंस्था

**प्रस्तावना –**

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जागतिक शांतता व मानवविकास हे ध्येय केंद्रस्थानी असलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्कांचा जाहीरनामा घोषित केला. या घोषणापत्रातील कलम एक अनुसार 'सर्व मानव जन्मतःच स्वतंत्र आहेत व त्यांना समान प्रतिष्ठा व समान अधिकार आहेत'. या हक्कप्राप्तीसाठी कोणत्याही आधारावर मानवामानवा मध्ये भेदभाव केला जाणार नाही. अशा स्वरूपाचे जवळपास तीस कलमे या जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात आले. या जाहीरनाम्यानुसार स्त्री पुरुष असा लिंगभावावर आधारित (Gender Based) भेदभाव करणेही अमान्य आहे. मानवी हक्कांच्या मागणीचा इतिहास तसा फार जुना आहे. इंग्लंडच्या घटनात्मक विकासानुसार १६८९ मध्ये पार्लमेंटने बिल ऑफ राईटस मान्य केले. जॉन लॉक या सामाजिक करारवादी विचारवंताच्या कल्पनांवर आधारित विधेयक पार्लमेंटमध्ये संमत करण्यात आले. ज्यामुळे राजाच्या (King) अनियंत्रित सत्तेवर मर्यादा घालण्यात आल्या.त्याबरोबरच संसदेची नियमितता, मुक्त व न्याय्य वातावरणात निवडणुका, संसद सदस्यांना विशेषाधिकार इत्यादी गोष्टी सामान्य नागरिकांना प्राप्त झाल्या.

१७८९ मध्ये फ्रान्समध्ये रूसोच्या स्वातंत्र्य , समता व बंधुत्व या राजकीय मूल्यांना केंद्रस्थानी मानून सामान्य नागरिकांनी जुलूम करणारी राजसत्ता उलथून टाकली. या काळात मोंटेस्क्यु या विचारवंताने 'सत्ताविभाजनाचा सिद्धांत' मांडला. फ्रान्सची वैभवशाली राज्यक्रांती हा देखील मानवी हक्कांच्या विकासातील महत्वाचा टप्पा आहे. याचकाळात म्हणजे १७७६ मध्ये अमेरिकेत देखील ब्रिटीश वसाहतवादाविरुद्ध राज्यक्रांती घडून आली. या क्रांतीमुळे जगातील प्रथम लिखित स्वरुपातील राज्यघटना अस्तित्वात आली. अमेरिकन नागरिकांना लिखित स्वरुपात मुलभूत हक्क देण्यात आले. अमेरिकन राज्यक्रांतीनर जगातील अनेक देशांना प्रेरणा दिली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देशाला इंग्लंडच्या वसाहतवादापासून मिळालेले स्वातंत्र्य हि सुध्दा क्रांतिकारक घटना होती. कारण भारतासारखे खंडप्राय, बहुल ओळखी असणारे राष्ट्र एका जागतिक महासत्तेच्या विरुध्द एकवटले व शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यकर्त्यांसमोर पहिला प्रश्न होता, तो म्हणजे राज्यसंस्था निर्माण करणे, शासनप्रकार निश्चित करणे व एवढ्या मोठ्या जनसमुदायाला न्याय, अधिकार यांची शाश्वती देणे. यासाठीची राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया स्वातंत्र्यापूर्वीच सुरु झाली. जवळपास तीन वर्षाच्या अथक प्रयत्नांतून भारतीय राज्यघटनेचा अंतिम मसुदा तयार करण्यात आला. हा मसुदा निर्माण करण्यात मसूदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोलाचा वाटा होता. राज्यघटना निर्माण करताना तत्कालीन जागतिक घडमोडी व ऐतिहासिक संदर्भ त्यांनी घेतले. भारतीय राज्यघटनेचा सरनामा, भाग तीनमध्ये असलेले मुलभूत हक्क, भाग चारमध्ये असलेले मार्गदर्शक तत्त्वे, सत्ताविभाजनाचे तत्त्व, स्वतंत्र न्यायपालिका इत्यादी वैशिष्ट्यांमुळे सामान्य माणसाला हक्कांचा उपभोग घेणे शक्य झाले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यघटनेने भारतात संसदीय लोकशाही शासनपद्धतीला सुरुवात झाली.घटनाकर्त्यांनी भारतीय नागरिकांना लिखित

हक्क प्रदान केले. मूलभूत हक्क ही भारतीय संविधानातील अधिकारांची सनद आहे. ही सनद भारतीयांना भारतीय नागरिक म्हणून त्यांचे आयुष्य शांतता व समानतेने व्यतीत करण्याचे नागरी अधिकार प्रदान करते. इंग्लंडचे हक्कांविषयीचे विधेयक, अमेरिकन संयुक्त राज्यांचे हक्कांविषयीचे विधेयक, आणि फ्रान्सचे मानवाच्या अधिकाराच्या घोषणा यांमध्ये भारताच्या मूलभूत अधिकारांचे मूळ आहे. असे असले तरी मानवी हक्कांच्या संदर्भात वंचित घटकांना न्याय मिळतांना किवा त्यांना स्वविकासासाठी आवश्यक वातावरण निर्मिती होण्यात अडथळे निर्माण झालेले दिसतात. जसे की, स्त्रिया, बालके, आदिवासी, दलित, असंघटीत कामगार, युध्दग्रस्त, शेतकरी, वांशिक घटक, अपंग, जातीय व धार्मिक अल्पसंख्य इत्यादींचे प्रश्न अजूनही सामाजिक अवकाशात पूर्णत्वास गेलेले दिसत नाहीत.

भारतीय समाज हा विविध वैशिष्ट्यांनी भरलेला समाज आहे.भारतात जात, धर्म, वंश, लिंग, जन्मस्थान, भाषा, संस्कृती अशा विविध आधारावर भेद आहेत भारतीय समाजात ऐतिहासिक काळापासून वर्णपद्धतीनुसार जातीजातीवर आधारित व्यवसाय अशी उतरंड बघायला मिळते याशिवाय समाजातील स्त्रियांना दुय्यम वागणूक मिळते. दुर्गम भागात राहणारे आदिवासी, दलित, वृद्ध व अपंगांचे प्रश्न आहेत. मानवी हक्कांचे उल्लंघन अनेक प्रकारे होऊ शकते. काहीवेळा ते स्पष्टपणे लक्षात येते. तर काहीवेळा त्याचे स्वरूप स्पष्ट नसते. मानवी हक्कांच्या बाबतीत उल्लंघन हे व्यक्तीकडून, समूहाकडून व व्यवस्था (सरकारकडून) होऊ शकते त्यामुळे त्याचे स्वरूप विविध घटकांचा आधार घेऊन समजून घेता येते.

**१) मानवी हक्क आणि स्त्रिया –** आधुनिक काळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क प्राप्त आहेत. स्त्रियांना शिक्षण प्राप्त झाल्यामुळे त्या सामाजिक बंधनातून मुक्त झाल्या आहेत. असे असले तरी कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या हक्कांचे उल्लंघन होते. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी वेतन, स्त्रियांचे आरोग्याचे प्रश्न असतात. मासिक पाळीच्या दरम्यान त्यांना रजा नाकारणे, प्रसूतीकाळात रजा नाकारणे, लहान बालकांना दुग्धपान करण्यासाठी विशेष ठिकाणाचा अभाव असणे, पात्र असतानाही सबळ कारणाशिवाय नोकरी नाकारणे असे स्त्रियांचे प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहेत. भारतात स्त्रियांचा राजकीय सहभागदेखील अत्यल्प आहे. ज्या स्त्रिया स्थानिक पातळीवर राजकारणात सहभागी आहेत त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले जात नाही. निर्णय प्रक्रिया आजही पुरुषांच्या हाती आहे.

**२) मानवी हक्क आणि आदिवासी –** भारतात दुर्गम भागात राहणाऱ्या जनजातींना 'आदिवासी' म्हणून संबोधले जाते. या आदिवासींची स्वतःची बोलीभाषा व संस्कृती असते. या आदिवासींना मुख्य प्रवाहात सामील होऊन त्यांचा विकास साधता येईल यासाठी घटनात्मक तरतूद करण्यात आली. आदिवासी ज्या ठिकाणी वास्तव्यास आहेत तेथे वनांसाठी जमिनी संरक्षित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहासाठी शेतजमिनी उपलब्ध न होणे, शासनाच्या वनकायद्यामुळे त्यांच्यावर मर्यादा आल्या आहेत. शासनाने अनेक राज्यांमध्ये खाणकामाचे परवाने दिल्यामुळे आदिवासींच्या आयुष्यात शहरी लोकांचा हस्तक्षेप वाढला आहे.

**३) मानवी हक्क आणि असंघटीत कामगार –** खाजगी व्यवसाय क्षेत्र किंवा अत्यल्प कर्मचारी असलेले घरगुती व्यवसाय यांचा समावेश असंघटीत क्षेत्रामध्ये होतो. या क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. या क्षेत्राला अनौपचारिक क्षेत्र असेही म्हणतात. भारत सरकारच्या महसुलात या क्षेत्राचे मोठे योगदान आहे. तसेच बहुसंख्य लोकांना रोजगार देते. तरीही या क्षेत्रात रोजगाराची हमी नसणे, कमी वेतन निकृष्ट दर्जाचे राहणीमान त्यातून उद्भवणार्या आरोग्यविषयक समस्या इत्यादी गोष्टींमुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची स्थिती सामाजिक दृष्ट्या तितकीच दयनीय असलेली दिसून येते.

**४) मानवी हक्क आणि बालके –** संयुक्त राष्ट्रांच्या बालहक्क कायद्यानुसार १८ वर्षापेक्षा कमी वयाची व्यक्ती म्हणजे बालक. भारतीय राज्यघटनेनुसार १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या कामगाराला बालकामगार असे संबोधले जाते. प्रौढ व्यक्तीच्या तुलनेत बालक हा श्रमाचा स्वस्त स्त्रोत असतात. त्यामुळे बऱ्याचशा असंघटीत क्षेत्रात बालकांकडून कामे करून घेतली जातात. भारतात दोन वर्षाच्या आतील अर्भकांच्या मृत्युचे प्रमाणही लक्षणीय आहे. दुर्गम व डोंगराळ भागातील बालकांच्या कुपोषणाची समस्या गंभीर आहे. बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार ज्यामुळे त्यांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होतात.

**५) मानवी हक्क आणि युध्दग्रस्त –** अनेक देशांच्या दरम्यान नैसर्गीक संसाधने, सिमाविवाद, धार्मिक कारणावरून संघर्ष असतो. हा संघर्ष शिगेला पोहोचला की युध्दजन्य किंवा युद्धाची परिस्थिती निर्माण होते. युद्धाच्यावेळी त्या प्रदेशात अराजकता असते. अराजकतेची स्थिती सामान्य परिस्थितीपेक्षा वेगळी असते. कायदा व सुव्यवस्थेचा पूर्णपणे अभाव असतो. अशावेळी शत्रुपक्षातील नागरिकांवर विशेषतः स्त्रियांवर व बालकांवर अनन्वित अत्याचार होतात. सैनिकांकडून स्त्रियांवर बलात्कार , संपत्तीची लुटमार असे अनेक प्रकार घडून येतात.

**६) मानवी हक्क आणि दलित –** भारतीय समाजात ऐतिहासिक दृष्ट्या व्यवसायावर आधरित जातींची उतरंड बघायला मिळते. यामध्ये व्यक्तीचे सामाजिक स्थान पारंपारिक व्यवसायावरून ठरते. भारतीय वर्णपद्धतीत चौथा व शेवटचा वर्ण अस्पृश्य म्हणून ओळखला गेला. या वर्गाला अस्वच्छ व तुलनेने हीन व्यवसाय करण्यास भाग पडले गेले. अशा समुदायांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुविधा नाकारण्यात आल्या. त्यामुळे हा समुदाय मागासलेला राहिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घटनात्मक तरतुदी करून सामाजिक न्यायाच्या परिप्रेक्ष्यातून त्यांचे सक्षमीकरण

करण्याचा प्रयत्न झाला. या समुदायांच्या संरक्षणासाठी विविध कायदे करण्यात आले. असे असले तरीसुद्धा दलित व्यक्तीची विवस्त्र धिंड काढणे, दुर्गंधीयुक्त क्षेत्रात काम करण्यास भाग पडणे, मानवी मैला साफ करण्यास सांगणे, खाण्यायोग्य नसलेल्या गोष्टी खाण्यास भाग पाडणे, प्राणघातक हल्ला करणे, शैक्षणिक व रोजगाराच्या ठिकाणी भेदभाव करणे, मतदान करण्यास सक्ती करणे, हत्या करणे इत्यादी प्रकार घडताना दिसतात.

७) **मानवी हक्क आणि शेतकरी** - 1990 च्या दशकानंतर जगात अनेक देशांनी अमेरिका प्रणित भांडवलवादी धोरण स्वीकारले. ज्यामुळे नवीन आर्थिक सुधारणाही सरकारांना स्वीकाराव्या लागल्या. विशेषतः भारतात पारंपरिक शेतीची जागा आधुनिक पद्धतीच्या शेतीने घेतली. उच्च उत्पादन देणारी बि- बियाणे, रासायनिक खते,यांत्रिक अवजारे, विजेवर चालणारे पाण्याचे पंप इ. चा वापर मोठ्या प्रमाणात झाला. सुरुवातीच्या दहा ते पंधरा वर्षात याचे काही सकारात्मक परिणाम दिसून आले जसे की, शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली, शेतीक्षेत्रात खाजगी संस्थांकडून वित्तपुरवठा झाला. परंतु सरकारच्या धोरणांमुळे, जलवायु परिवर्तन, अनियमित निसर्गचक्र यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चा इतके देखील उत्पन्न मिळेनासे झाले. पाच ते दहा एकर शेती असूनदेखील कुटुंबाच्या सर्व गरजा शेतकऱ्यांना भागविता येत नाहीत. आर्थिक दुष्टचक्रात सापडल्याने महाराष्ट्र, तेलंगाना, मध्यप्रदेश यासारख्या राज्यांमधील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी सरकार निर्यात बंदीसारखे निर्णय घेते मात्र शेतीचा उत्पादन खर्च व प्रत्यक्ष मिळणारा मोबदला यातील फरक सरकार भरून देत नाही, दिले तरी सरकारकडून मिळणारी अनुदानरुपी भरपाई तोकडी असते.पंजाबसारख्या प्रगत राज्यात शेतीत मोठ्या प्रमाणात रासायनिक खते, तणनाशके व कीटकनाशके यांचा वापर झाल्याने तेथील शेती व भूजल प्रदूषित झाले आहे. त्याचा दुष्परिणाम म्हणून कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराचे रुग्ण तेथे मोठ्या प्रमाणात वाढताना दिसतात. बरेचसे भारतीय शेतकरी अल्पभूधारक आहेत ते स्वमालकीच्या शेतीक्षेत्रातून स्वतःची गुजराणदेखील करू शकत नाहीत.

८) **मानवी हक्क आणि वांशिक हत्या** - जगात अनेक वंशाचे लोक राहतात. या वांशिक ओळखी नैसर्गिक आहेत. परंतु वांशिक ओळखींना राजकीय स्वरूप प्राप्त झाले की, बहुसंख्य असणारे वांशिक गट अल्पसंख्य असणाऱ्या वांशिक गटावर अन्याय, अत्याचार करतात. भारतात देखील ईशान्येकडील नागरिकांना दिल्ली आणि देशातील इतर शहरांमध्ये वांशिक भेदभावाच्या आधारावर अत्याचारांचा सामना करावा लागतो. अमेरिकेतील कृष्णवर्णीयांवर होणारा वांशिक अत्याचार, आफ्रिकेतील वांशिक गटातील संघर्ष ह्या मानवी हक्कांच्या दृष्टीने संवेदनशील घटना आहेत.

९) **मानवी हक्क आणि अपंग व्यक्ती** – अंधत्व, शारीरिक अक्षमता, बहिरेपणा, मतिमंदत्व, बौद्धिक आजार इत्यादी व्यक्ती अपंग किंवा दिव्यांग म्हणून ओळखल्या जातात. अशा व्यक्ती भावनिकदृष्ट्या हळव्या असतात. समाजातील सदृढ व्यक्तीकडून जाणते अजाणतेपणी अशा व्यक्तींचा छळ होत असतो. त्यांच्या व्यंगावरून अशा व्यक्तीची चेष्टा केली जाते. कुटुंबातील सदस्यांकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होते, वैद्यकीय सुविधा मिळत नाहीत, लैंगिक छळदेखील होतो. अनेकदा बळजबरीने उपचार केले जातात. भारत सरकारने अशा दिव्यांग व अपंगांसाठी वेगवेगळया योजना निर्माण केल्या आहेत मात्र संख्येच्या प्रमाणात सरकारचे प्रयत्न कमी पडतात.

**१०) मानवी हक्क आणि वृद्ध ( ज्येष्ठ नागरिक)** - वृद्ध किंवा ज्येष्ठ व्यक्ती म्हणजे साठ वर्षापेक्षा जास्त वय असणारी व्यक्ती वृद्ध व्यक्ती शरीराने सक्षम नसतात. अशा व्यक्ती घरातील इतर तरुण किंवा काम करण्यास सक्षम असणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत दुर्लक्षित असतात. कुटुंबातील इतर सदस्यांकडून त्यांना शिवीगाळ व अपमानित करण्यात येते. वृद्ध व्यक्ती हळव्या असतात. त्यांना मानसिक आधाराची गरज असते. अनेक वृद्धांना व्याधी असते औषधोपचाराची गरज असते. मात्र त्यांना एकाकी आयुष्य जगावे लागते. विभक्त कुटुंबपद्धती, शहरात राहण्याच्या जागेची कमतरता यामुळे अशा वृद्ध सदस्यांना वृद्धाश्रमात ठेवले जाते. आर्थिक सुरक्षितता नसल्याने अनेक वृद्धांना कष्टाची कामे करावी लागतात. वृद्ध स्त्रियांना संपत्ती स्वतःच्या नावावर नसल्यामुळे पतीच्या निधनानंतर हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. शहरात वृद्ध जोडपे असणार्या सदनिकांमध्ये चोरी, दरोडा किंवा खून असे प्रकार घडतात.

**समारोप** :

व्यक्तीच्या हक्कांची चर्चा करताना समाजाचा, राज्यसंस्थेचा विचार करावा लागतो. कारण व्यक्तीला जे हक्क आवश्यक असतात ते त्याला समाज व राज्यसंस्थेचा सदस्य म्हणून मिळतात. सामुहिक जीवनात व्यक्तीला स्वतःच्या हक्कांबरोबरच इतरांच्या हक्कांची जोपासना करावी लागते. एक व्यक्तीचे हक्क हे इतरांचे कर्तव्य ठरते. आपल्याला जसे हक्क आवश्यक असतात तसेच ते इतरांनाही आवश्यक असतात. त्यामुळे मानवी हक्काची पूर्तता होण्यासाठी समूहाची कर्तव्यभावना महत्त्वाची असते. मानवी हक्क कायदेशीर असण्याबरोबरच नैतिक कल्पनांवरदेखील आधारलेले असतात. सर्वच गोष्टी कायद्यात समाविष्ट करणे शक्य नसते. त्यामुळे समाजातील सर्व सदस्यांची नैतिकता हा मानवी हक्कांचा आधार आहे.व्यक्तीच्या व्यक्तित्वाचा विकास करण्याची संधी नाकारणे ही गोष्ट नैतिकदृष्ट्या अयोग्य मानली जाते. जगात मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक कायदे अस्तित्वात आहेत मात्र प्रत्येक समस्या कायद्याने सुटत नाही त्यासाठी मानवाची सदसदविवेकबुद्धी महत्त्वाची असते. मानवी हक्कांच्या संदर्भात आदिवासी, दलित, स्त्रिया, बालके, वृद्ध, अपंग, कष्टकरी, कामगार, युध्दग्रस्त, अल्पसंख्य गट,

वांशिक गट इत्यादी वंचित घटकांचे प्रश्न कायद्याबरोबरच सामाजिक सहकार्याने सोडविता येतील.

**संदर्भ :**


१) https://www.un.org/en/about-us/universal-declaration-of-human-rights
२) https://marathi.indiatimes.com/career/competitive-exams/human-rights
३) https://nhrc.nic.in/
४) ओ.पी.गौबा, (२०१२), An Introduction to Political Theory (मराठी अनुवाद:तुकाराम जाधव), पुणे केसागर
५) राजीव भार्गव, अशोक आचार्य, (२०११) Political Theory: An Introduction (मराठी अनुवाद:हेमंत खानझोडे), पुणे, पिअर्सन
६) डॉ.विजय देव,गोसावी, आपटे, (२०१५), राजकीय संकल्पना आणि सिद्धांत, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स
७) पी. के. कुलकर्णी, (२०१२), मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, पुणे डायमंड पब्लिकेशन
८) योजना मासिक
९) लोकराज्य मासिक




**प्रा. अमित ए. बोरसे**